दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ दैनिक ■ धाराशिव ■ अंक 195 ■ मंगळवार,दि .26 ऑगस्ट 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

**सुविचार**

आयुष्यात संघर्षाशिवाय प्रगती नाही म्हणून संघर्षाला स्वीकारा.



**शेकडो चिमुकल्या हातांनी साकारले मातीचे गणपती बाप्पा**

पेज 4

# चिंताजनक: सात महिन्यात ८१ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले

## चाळीशीच्या आतील ४२ तरुण शेतकऱ्यांनी नैराश्यातून जीवन संपवले

### जिल्ह्यात दर आठवड्याला ३ शेतकरी आत्महत्या

सज्जन यादव | आरंभ मराठी

धाराशिव –धाराशिव जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या हा विषय दिवसेंदिवस चिंताजनक बनत चालला आहे. नापिकी, शेतीपिकांना हमीभाव नसणे, नैसर्गिक संकटे, कर्जाचा विळखा यांमुळे धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येसारखा कठोर निर्णय घेऊन जीवन संपवत आहेत. जानेवारी ते जुलै या सात महिन्याता जिल्ह्यातील ८१ शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून टोकाचे पाऊल उचलले आहे. विशेष म्हणजे आत्महत्या केलेल्या ८१ शेतकऱ्यांपैकी ४२ शेतकरी हे चाळीशीच्या आतील तरुण शेतकरी आहेत. जिल्ह्यासाठी ही चिंताजनक गोष्ट असून, शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्याची गरज आहे. धाराशिव जिल्ह्यात आठवड्याला तीन शेतकरी आत्महत्या करत असल्याच्या घटना समोर येत आहेत. शेतकरी आत्म हत्यांच्या घटनांमध्ये जुलै महिन्यात मोठी वाढ झाली असून, तब्बल १८ शेतकऱ्यांनी एकाच महिन्यात जीवन संपवले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील आत्महत्येचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. पाण्याची कमतरता, नापिकी, पिकांना योग्य भाव न मिळणे, नैसर्गिक आपत्ती आणि सरकारडकडून ठोस उपाययोजना नसणे अशा घटनेमुळे जिल्ह्यातील शेतकरी नाउमेद होत असल्याचे चित्र दिसत आहे. मागच्या वर्षी २०२४ मध्ये धाराशिव जिल्ह्यातील १५२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. जिल्ह्यात दर आठवड्याला तीन शेतकरी आत्महत्या होत आहेत. शेतकरी आत्महत्येच्या बाबतीत धाराशिव जिल्हा मराठवाड्यात बीड नंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. आत्महत्येचा हा आलेख २०२५ या वर्षातही तसाच राहिल्याचे दिसत असून, आतापर्यंत १ जानेवारी ते ३१ जुलै या सात महिन्यात धाराशिव जिल्ह्यातील ८१ शेतकऱ्यांनी आत्म हत्या केल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे या ८१ शेतकऱ्यांमध्ये ४२ तरुण शेतकऱ्यांचा समावेश आहे. ज्या शेतकऱ्यांचे वय तिशीच्या आत होते. अशा २५ जणांनी स्वतःहून जीवन संपवले आहे. शेतकरी आत्म हत्यांचे सत्र थांबविण्यात शासन व प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. जिल्हा प्रशासनाध्या नोंदणीनुसार मागच्या तीन वर्षात धाराशिव जिल्ह्यातील तब्बल ४४० शेतक–यांनी आत्महत्या करून जीवन संपवले. त्यापैकी १५७ शेतकरी हे पस्तिशीच्या आतील होते. धाराशिव जिल्ह्याचे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण शेजारच्या लातूर जिल्हापेक्षा दुप्पट आहे. मागील दहा वर्षांचा विचार करता यवतमाळ नंतर राज्यात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या धाराशिव जिल्ह्यात झाल्या आहेत. कर्जबाजारीपणा, नापिकी, नैसर्गिक आपत्ती यांमुळे शेतकऱ्यांचे मनोबल दिवसेंदिवस कमजोर होत असून, शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. शासन प्रशासनासह राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. विविध कारणांनी शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. यातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नसल्यामुळे तरुण शेतकरी देखील टोकाचे पाऊल उचलत आहेत.




### भूम तालुक्याचा आदर्श घ्यायला हवा

जिल्ह्यातील इतर तालुक्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र मोठ्या प्रमाणात सुरू असताना भूम तालुक्यात मात्र वेगळे चित्र दिसत आहे. भूम तालुक्यात सात महिन्यात केवळ एकाच शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. भूम तालुक्यातील शेतकरी शेतीसोबतच पशुपालनाचा व्यवसाय करतात. शेतीतून अपेक्षित उत्पन्न आले नाही तरी दुग्धव्यवसायातून ती कसर भरून काढली जाते. दूध, खवा या शेतीपूरक व्यवसायातून शेतकऱ्यांनी उत्पन्नाचे पर्याय शोधले आहेत. त्यामुळे भूम तालुक्यातील शेतकरी तुलनेने आर्थिक विवंचनेत नाहीत असे दिसते. भूम तालुक्याचा हा आदर्श इतर तालुक्यांनी घेतल्यास शेतकरी आत्महत्येवर आळा बसू शकतो. प्रशासनाने याबाबतीत प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**कोणत्या महिन्यात किती आत्महत्या झाल्या**

| महिना | आत्महत्या |
|---|---|
| जानेवारी | १० |
| फेब्रुवारी | १० |
| मार्च | ११ |
| एप्रिल | १४ |
| मे | ११ |
| जून | ७ |
| जुलै | १८ |
| एकूण | ८१ |

**तालुकानिहाय आत्महत्या**

| तालुका | आत्महत्या |
|---|---|
| धाराशिव | १७ |
| कळंब | ११ |
| तुळजापूर | १६ |
| उमरगा | ७ |
| लोहारा | ३ |
| परंडा | ९ |
| वाशी | १७ |
| भूम | १ |
| एकूण | ८१ |

### पीककर्ज न मिळाल्यामुळे खाजगी सावकाराकडून कर्ज

पीककर्ज मिळणे हा शेतकऱ्याचा अधिकार असतो. परंतु सरकारी बँका पिककर्ज वितरणात टाळाटाळ करतात. सीबील ची किचकट अट अजूनही पीककर्ज देताना तपासली जाते. शेतकऱ्यांना हक्काचे कर्ज न मिळाल्यामुळे शेतकरी खाजगी सावकारापुढे हात पसरतात. खाजगी सावकार भरमसाठ व्याजाने कर्ज देतात आणि हे कर्ज भरताना शेतकऱ्याच्या नाकीनऊ येते. निम्मा पावसाळा संपला तरी यावर्षी केवळ पन्नास टक्के पिककर्जाचे वितरण झाले आहे. सध्या जिल्ह्यातील ४५ हजार ५४३ शेतकऱ्यांकडे राष्ट्रीयकृत, खाजगी, क्षेत्रीय आणि डिसीसी व सहकारी बँकांचे एकूण ७७२ कोटी ३९ लाख रुपये कर्ज थकीत आहे. सरकारने आश्वासन दिल्याप्रमाणे शेतकरी कर्जमाफी होईल या आशेने शेतकऱ्यांनी कर्ज भरलेले नाही. परिणामी, थकबाकी वाढत जाऊन कर्जाचा डोंगर मोठा झाला आहे.

### ३५ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय मदत

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना सरकारकडून एक लाखांची मदत दिली जाते. आतापर्यंत ८१ पैकी ३५ शेतकऱ्यांना ही मदत करण्यात आली आहे. इतर शेतकऱ्यांचे मदतीचे प्रस्ताव पाठवण्यात आले आहेत.

## धाराशिवमध्ये जुगार अड्ड्यावर छापा, आठ जणांना अटक

आरंभ मराठी | धाराशिव

गावसुद रोडलगत असलेल्या शेतातील बंदिस्त रुमम ध्ये सुरू असलेला तिरट जुगार उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाने शनिवारी उघडकीस आणला. या कारवाईत आठ जणांना अटक करण्यात आली असून सुमारे ३ लाख ४२ हजार चारशे साठ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत यांच्या आदेशावरून करण्यात आली. २३ ऑगस्ट रोजी रात्री गस्तीदरम्यान पथकास गोपनीय माहिती मिळाली की गावसुद रोडलगत असलेल्या शेतातील खोलीत काही इसम तिरट जुगार खेळत आहेत. त्यानुसार रात्री अकरा वाजून तीस मिनिटांनी छापा टाकण्यात आला असता शहेद सल्लाउद्दीन शेख (वय ४०, रा. खाजा नगर धाराशिव), देविदास केरबा सोनवणे (वय ५३, रा. खाजा नगर धाराशिव), जुबेर जमील शेख (वय ४०, रा. खाजा नगर धाराशिव), बाळासाहेब गणेश काकडे (वय ६५, रा. निंबाळकर गल्ली धाराशिव), रफिक लाला शेख (वय ४२, रा. खाजा नगर धाराशिव), शेखर संदीपान शिंदे (वय ३१, रा. देशपांडे स्टॅण्ड धाराशिव), सिद्धांत अरुण बनसोडे (वय ३४, रा. भिमनगर धाराशिव) आणि सचिन सुनिल मोटे (वय ३०, रा. भिमनगर धाराशिव) असे आठ जण तिरट जुगार खेळताना आढळले.

## मराठा आंदोलकांच्या गाड्यांना टोलमाफी द्या



**तुळजापूर**–मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या मुंबई येथील आंदोलनासाठी जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी देण्याची मागणी तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मुंबई येथे आंदोलन होणार आहे यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून मराठा बांधव मोठ्या संख्येने मुंबईला २७ रोजी निघणार आहेत या सर्व पार्श्वभूमीचा विचार करून मुंबईला जाणाऱ्या रस्त्यावरील टोल नाक्यावर आंदोलकांच्या वाहनांना टोलमाफी देण्यात यावी जेणेकरून वाहतूक कोंडी होणार नाही तसेच आंदोलकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येक टोल नाक्यावर योग्य त्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य सुविधा पुरवण्याची मागणी देखील यावेळी करण्यात आली आहे. आंदोलनामुळे गर्दी व प्रचंड वाहतुकीमुळे आजारी पडणाऱ्या किंवा जखमी होणाऱ्या आंदोलकांना तात्काळ उपचार मिळण्यास यामुळे मदत होणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर इंग्रजीत साळुंके, बाळासाहेब भोसले, प्रशांत इंगळे, धैर्यशील दरेकर यांच्या स्वाक्षरी आहेत.

## मद्यधुंद अवस्थेतील वाहन चालकावर गुन्हा

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील माडज शिवारात दारूच्या नशेत निष्काळजीपणे मोटारसायकल चालवल्याप्रकरणी एकावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दिलीप गोविंद सुगावे (वय ३४, रा. माडज, ता. उमरगा, जि. धाराशिव) हा २४ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुम ारास एमएच २५ एआर ८१३३ क्रमांकाची मोटारसायकल मद्यधुंद अवस्थेत वेगाने व निष्काळजीपणे चालवत होता. त्याने रस्त्यावरील प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण केला. या प्रकरणी उमरगा पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम २८१ सह मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## पर्याय रस्त्याची दुरावस्था वाहनधारकाचे हाल

तुळजापूर – धुळे–सोलापूर महामार्गावरील सिंदफळ येथे उड्डाणपुलाचे काम सुरू असून, यासाठी वाहनांना पर्यायी रस्ता तयार करण्यात आला असला तरी पंधरा दिवसातच त्या रस्त्याला खड्डे पडल्याने वाहनधारकांचे हाल होत असून निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आल्याचे दिसत आहे. सोलापूरहून लातूरला जाण्यासाठी सिंदफळ येथे बायपास तयार करण्यात आला आहे. मात्र हा बायपास तयार करताना येथे उड्डाणपुलाची आवश्यकता असताना सुरुवातीला येथे उड्डाणपूल बनवण्यात आला नव्हता त्यानंतर येथे बरेच अपघात होऊन लोक मृत्युम ुखी पडल्यानंतर येथे उड्डाणपुलाचे काम सुरू करण्यात आले आहे. पुलाचे काम सुरू असल्याने येथे पर्यायी रस्ता करण्यात आला आहे. मात्र हा रस्ता अत्यंत



निकृष्ट दर्जाचा करण्यात आल्याने या रस्त्यावर म ोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून वाहने जाताना मोठ्या प्रमाणात धूळ व कचखडी उडत आहे. त्यामुळे दुचाकी स्वरांच्या डोळ्यात ही धूळ जात असून, पडलेल्या खड्ड्यामुळे अपघाताचाही धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे याबाबत तात्काळ कारवाई करून हा रस्ता दुरुस्त करण्याची मागणी वाहनधारकातून होत आहे.

## आरळी परिसरातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पीकांसह नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी

**तुळजापूर**:–अतिवृष्टीमुळे झालेले पीकांचे व शेतीचे तसेच जनावरे दगावलेले नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई मिळावी यासाठी जिल्हाधिकारी यांना तुळजापूर तहसीलदारमार्फत आरळीचे सरपंच किरण व्हरकट यांनी निवेदन दिले आहे.तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक महसूल मंडळात ६ ते २० ऑगस्ट या कालावधी दरम्यान ढगफुटी सदृश्य, मुसळधार ते अति मुसळधार व सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पीकांचे व शेतीचे तसेच शेतकऱ्यांची गुराढोरांचे नुकसान झाले असून, त्याबाबत अद्यापपर्यंत नुकसानीचे पंचनामे करण्यात आले नाहीत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून त्याबाबतचा अहवाल सरकार दप्तरी पाठवून आर्थिक मदत मिळवून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तहसीलदार यांना निवेदन देताना सरपंच किरण व्हरकट,माजी सरपंच गोविंद पारवे, उपसरपंच भीमराव सोनवणे, संजय पाटील, मकरंद बामनकर, संगाप्पा उकरंडे उपस्थित होते.आरळी बुद्रुक महसूल मंडळात आरळी बुद्रुक, येवती, चिंचोली, आरळी खुर्द, बसवंतवाडी, देवसिंगा (तुळ), बारूळ, व्होनाळा, हिप्परगा ताड, चिवरी, काळेगाव, बोरनदीवाडी गावे येत असून त्यांचे एकूण क्षेत्र ११,२०० हेक्टर इतके क्षेत्र असून, त्यापैकी लागवडी योग्य १०,३०० हेक्टर क्षेत्र असून त्यामध्ये कांदा, सोयाबीन. उडीद, तुर, मूग व मका यासारखी खरीप हंगामातील पिके आहेत. तसेच द्राक्षे, पेरू, आंबा यासारखी बहुवार्षिक पिके यांचे उत्पादन घेतले जाते.

**आरंभ मराठी** हरित संदेश,रोटरी क्लबची उपक्रमशील कार्यशाळा

# नूतन विद्यामंदिरात विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरण पूरक गणेश मूर्ती

आरंभ मराठी | धाराशिव



आपला सण, आपली जबाबदारी, हा हरित संदेश देत धाराशिव शहरातील नूतन प्राथमिक विद्यामंदिरात रोटरी क्लब धाराशिवच्या सहकार्याने मातीच्या गणपती मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी साकारलेल्या आकर्षक मातीच्या मूर्तींनी केवळ शाळा परिसर रंगतदार झाला नाही तर पुढील पिढीमध्ये पर्यावरण संवर्धनाची ठाम बीजे रोवली गेली. या कार्यशाळेत प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे पाणीप्रदूषण, नद्यांतील जलचरांवरील घातक परिणाम याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कलाध्यापक शेषनाथ वाघ यांनी प्रत्यक्ष मातीपासून गणेशमूर्ती कशी तयार करावी हे दाखवून दिले. मुलांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत स्वतःच्या कल्पनाशक्तीने सुंदर, आकर्षक आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्ती घडवल्या.या कार्यशाळेत आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, सरचिटणीस सौ. प्रेमाताई पाटील, रोटरी क्लब अध्यक्ष रणजीत रणदिवे, सचिव प्रदीप खामकर, अभिजीत पवार आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना निसर्ग वाचवणे हीच खरी गणेशभक्ती, असा संदेश दिला. शाळेचे मुख्याध्यापक प्रदीपकुमार गोरे यांनी सण साजरा करताना पर्यावरणपूरक मार्ग निवडण्याचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रम ाला शाळेतील शिक्षक–शिक्षिका, पालक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोठा प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेतून घेतलेला हरित संदेश आपल्या घराघरात पोहोचवण्याची ग्वाही दिली.




### पर्यावरण रक्षणाचा संदेश

या उपक्रमामुळे केवळ मुलांमध्ये सर्जनशीलतेचा विकास झाला नाही, तर गणपती उत्सव हा आनंदाचा सोहळा असतानाच तो पर्यावरण रक्षणाचा नवा संकल्पही ठरू शकतो, हे वास्तव अधोरेखित झाले.

## कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासावर भर

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पत्रकार परिषदेत ग्वाही

आरंभ मराठी | कोल्हापूर



कोल्हापूर जिल्ह्यातील नागरिकांसाठी राज्य सरकारच्या विकास योजनांची माहिती देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी जिल्ह्याच्या सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे सांगत स्थानिक समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त केला.

पवार म्हणाले की, कोल्हापूर हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा आर्थिक व सांस्कृतिक केंद्र असून येथील विकासाला गती देणे हे सरकारच्या प्राथमिक उद्दिष्टांपैकी एक आहे. शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय शेतीला चालना देणे, जलसंधारणाची नवी प्रकल्पे उभारणे आणि शेतीत तंत्रज्ञानाचा अधिक वापर वाढवणे यावर सरकार काम करत आहे. ग्रामीण भागातील शाळांना संगणक, डिजिटल शिक्षण सुविधा देऊन विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळावे यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षकांची नियुक्ती केली जाणार आहे. त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्रांचे आधुनिकीकरण, वैद्यकीय सेवा वाढविणे, पोषण सुधारणा आणि जनजागृती कार्यक्रमांचा विस्तार केला जाईल.जिल्ह्यातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी रस्त्यांचे नूतनीकरण, पुलांची दुरुस्ती आणि ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतुकीचा विस्तार करण्यावर सरकारचा भर आहे. महिलांसाठी स्वयंसेवी संस्थांना बळकट करून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच बालकल्याणासाठी नवी योजना सुरू करण्यात येणार आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी जंगल संवर्धन, जलस्रोतांचे शाश्वत व्यवस्थापन आणि स्वच्छता मोहिमांचा विस्तार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.पत्रकार परिषदेत दरम्यान एक गंमतीशीर प्रसंग घडला. शासकीय विश्रामगृह परिसरात अचानक दोन घोडी धावत आल्याने उपस्थितांमध्ये क्षणभर तणाव निर्माण झाला, मात्र लगेचच वातावरण हलके–फुलके झाले आणि या घटनेची माध्यमांमध्येही चर्चा रंगली.पवार यांनी स्थानिक प्रशासनाला जलद गतीने काम करण्याचे निर्देश दिले असून नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवण्याचे आश्वासन दिले. जिल्ह्यातील लोकांनी त्यांच्या घोषणांचे स्वागत केले असून विशेषतः कृषी सुधारणा आणि पायाभूत सुविधा याबाबत मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. येत्या काही महिन्यांत नवे रस्ते, शाळा, सार्वजनिक आरोग्य केंद्रे आणि महिला रोजगार योजना प्रत्यक्षात राबवली जातील, असेही त्यांनीस्पष्टकेले.

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
संपादकीय
मंगळवार,दि .26 ऑगस्ट 2025

# म्हणून जीवनात वाईट दिवस येणार ?



– बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट ता.अहमदपूर
जि.लातूर.मो.९५४५४४२६४८.

**संध्याकाळची वेळ होती.गावातील सगळे टुकार व व्यसनी तरुण मुले शाळेच्या मैदानावर गोळा होऊन मस्ती करत होते.कोणी मोबाईलवर गेम्स खेळत होते,काहीजण चॅटिंग करत होते.काहीजण क्रिकेट खेळत होते.त्यांचे खेळणे कमी आणि एकमेकांना घाण घाण शिव्या देणे जास्त चालू होते.काहीजण व्हॉलीबॉल खेळत होते.काहीजण शाळेच्या छतावर चढून उगाचच ओरडत होते,चिरकत होते. काही तरूण गुटखा व तंबाखू चघळून शाळेचा व्हरांडा रंगवत होते.काही विकृत मनोवृत्तीचे पोरं हातात अणकुचीदार दगड घेऊन शाळेच्या व्हरांड्यातील फरशी फोडत होते. झापड पडताच काही व्यसनी मुले शाळेच्या मागील मैदानावर जाऊन शांतपणे गप्पा मारत बसले होते.**

अंधार पडल्या बरोबर दारूचे घोट पोटात रिचवण्याची बहुतेक त्यांना घाई झाली होती. अंधार पडला की शाळेच्या आवारात दारू पिणे आणि दारूच्या बाटल्या तेथेच ठेवून निघून जाणे हे नित्याचेच झाले होते.ही वास्तविक परिस्थिती, हे विदारक चित्र जवळपास सर्वच गावात सुरू आहे.गावातील काही ज्येष्ठ नागरिक हे सगळे प्रकार दूरून पाहतात.त्यांना त्यांचे सुंदर व संस्कारमय बालपण आठवते. आजचा हा वाईट काळ पाहून ते हताश होतात.ते त्या बिघडलेल्या टुकार,व्यसनी व गुंड प्रवृत्तीच्या तरुणांना काही चांगले सांगू इच्छित होते पण हिंमत होत नव्हती. ते त्यांच्या मनाची समजूत काढत एकमेकांना सांगत होते,'मानवी जीवनात यापेक्षा आणखी खूप वाईट दिवस येणार आहेत!'सध्याचा काळ मानवी जीवनाचा खूप वाईट काळ आहे.आजची सामाजिक बिकट परिस्थिती आणि बऱ्याच लोकांची जीवन जगण्याची भयावह अमानुष शैली पाहून मनाला खूप वेदना होतात.आणि मनाला भिती वाटते की भविष्यात मानवी जीवनात आणखी खूप वाईट दिवस येणार आहेत! काही लोक उजेडात सत्कर्म करतात आणि अंधारात पाप करून नामानिराळे राहतात.व्यसनांच्या आहारी गेलेले युवा,तरुण,प्रौढ आणि काही वृद्ध माणसे यांची संख्या,व्यसनामुळे त्यांची व त्यांच्या कुटुंबीयांची होत असलेली वाताहत पाहिली की मनाला खूप खूप वेदना होतात.ज्या वयात मन लावून एकाग्रतेने शिक्षण शिकायचे असते त्या काळात मुले व मुली वाईट मार्गाला लागून जीवनाचा सत्यानाश करून घेत आहेत. आजचे तरुण तरुणी पार वाया गेले आहेत.बऱ्याच घरातून संस्कार नावाची गोष्ट नाश पावली आहे. शील व चारित्र्याला जीवापाड जपायचे असते हे विसरून जाऊन राजरोसपणे व्याभिचार केला जात आहे.गावोगावचे बिघडलेले तरूण दररोज ढाबा संस्कृतीचे जेवण करून वेगवेगळ्या जीवघेण्या रोगांना आमंत्रण देत आहेत.हे तरूण दारू पिऊन जेव्हा घरी जातात तेव्हा निर्लज्जपणे आई वडिलांना शिव्या घालत जन्मदात्यांचा उध्दार करतात. व्यसनी मुले कोणाचाही मुलाहिजा ठेवत नाहीत.आईवडिलांना बऱ्या बोलाने कधी चांगले शब्द बोलत नाहीत.काही लिंगपिसाट व्यक्ती आणि व्याभिचाराची लत लागलेले स्त्री व पुरुष नात्यांचे पावित्र्य पायदळी तुडवून रासलीला करताना दिसतात.लग्नाच्या बोहल्यावर चढताना एकमेकांशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेणारे पती पत्नी वाईट नादाला लागून विवाह बाह्य संबंध ठेवतात.हा आपल्या संस्कृती व संस्कारांचा फार मोठा पराभव आहे.काही हीन विचारांचे लोक यापेक्षाही अधिक अमानवी कृत्ये करुन पवित्र नात्यांना काळिमा फासत आहेत.भ्रष्टाचार आणि व्याभिचार जर शिष्टाचार होणार असेल आणि स्वतःच्या स्वार्थासाठी निष्कलंक व चारित्र्यवान लोकांना नावे ठेवून वाईट ठरवले जात असेल तर समाजाचे अध:पतन सुरू झाले आहे असे सम जावे. आईवडिलांनी वृध्द होईपर्यंत कष्ट करून तरूणांना पोसायचे आणि त्यांच्या दिवट्यांनी पत्नीचे ऐकून वृध्द आईवडिलांना घराच्या बाहेर काढायचे,शेत स्वतःच्या नावावर करून घेण्यासाठी आईवडिलांना कमालीचा शारीरिक व मानसिक त्रास द्यायचा हे कुठल्या संस्कृतीत बसते?म्हणून आज समाजात फार वाईट घटना घडत आहेत.बऱ्याच जणांचे आईवडील मुठीत जीव धरून कसेबसे जीवन जगताना दिसतात. आज असा अतिशय वाईट व अमानुष काळ चालू आहे तर भविष्यात यापेक्षाही अधिक वाईट काळ येणार आहे हे लक्षात घेतले पाहिजे.एक काळ असाही होता की लहानपणी चांगली स्वप्ने बघितली जायची.उच्च शिक्षण शिकून चांगला व्यक्ती बनण्याचे,नोकरीला लागण्याचे,आईवडिलांना सुखात ठेवण्याचे आणि समाजासाठी व गोरगरीबांसाठी काही करण्याचे जीवनध्येय बाळगले जायचे.परंतु, आज मोबाईलच्या नादात ही सगळी स्वप्ने बघणे बंद झाले आहे. मोबाईलचा गैरवापर सुरू आहे. लहानथोर,तरूण तरूणी यांनी मोबाईलवर अश्लील व्हिडिओ पाहणे,अश्लील कथा वाचणे,जे जे अत्यधिक वाईट असेल ते पाहणे हे प्रकार सुरू आहेत.ऑनलाईन गेमिंग,ड्रिम एलेवन,रमी सर्कलच्या नादात झटपट श्रीमंत होण्याच्या मोहापायी अनेक जणांचे खूप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.काही व्यक्ती तर जीवनातून कायमचे उठले आहेत.श्रीमंतीचा हव्यास, चंगळवादी जीवनाचा मोह,विविध व्यसनांची आवड,व्याभिचाराची लत आणि वाईट गोष्टींचे आकर्षण यामुळे मानवी जीवनात काळोख पसरला आहे.क्षणिक सुख आणि मोहांवर नियंत्रण न ठेवता आल्याने अनेकांच्या हातून वाईट घटना घडत आहेत.त्यामुळे मानवी जीवनातील सुख,समाधान,आनंद आणि समृद्धी नष्ट झाले आहेत.हे असेच चालू राहणार असेल,माणूस संस्काररूपी जीवन वाटेवर परत येणार नसेल तर मानवी जीवनात आणखी खूप वाईट दिवस येणार आहेत.हे अगदी खरे आहे आणि तितकेच अटळ आहे. ही वाईट परिस्थिती जर येऊ द्यायची नसेल तर आपणाला संत, महात्मे,महापुरुष,म हान विचारवंत, समाजसुधारक यांचे विचार आत्मसात करावेच लागतील.आणि तथागत गौतम बुद्धांनी सांगितलेल्या त्रिसरण,पंचशील आणि अष्टांग जीवन मार्गाचा अवलंब करावाच लागेल.त्यांनी सांगितलेली सम्यक दृष्टी,सम्यक जीवनशैली आणि सम्यक विचार सरणी आत्मसात केल्याशिवाय माणूस सुखी होणार नाही.

# ईटकळ येथे २५० विद्यार्थ्यांना शालेय किटचे वाटप



आरंभ मराठी | नळदुर्ग

तुळजापूर तालुक्यातील ईटकळ येथील जिल्हा परिषद शाळेत पौर्णिमा महिला संस्था अणदूर व गुंज संस्था, दिल्ली यांच्या वतीने २५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे किट वाटप करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव कु.बाबई चव्हाण हे होत्या यावेळी बाबही चव्हाण यांच्या हस्ते नागेश चव्हाण, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक तानाजी देवराव गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माशाळकर,ग्रामपंचायत ईटकळचे ग्रामसेवक नितीन कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शाळेतील अडीचशे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची किटाचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात मदत करणे, ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावणे व मुलांच्या शिक्षणात गुणवत्ता वाढवणे हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश असल्याचे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तानाजी देवराव गायकवाड यांनी संस्थेचे आभार मानताना सांगितले की, विद्यार्थ्यांसाठी ही अतिशय मोलाची मदत असून याचा उपयोग मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी नक्कीच केला जाईल असे मत व्यक्त केले.

# बालाजी गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी सूरज सोबजी,उपाध्यक्षपदी जमादार तर सचिव शिंदे

आरंभ मराठी | मुरुम



सुरज सोबाजी



इम्रान जमादार



श्रीकांत शिंदे

राज्यभर गणेशोत्सवाची लगबग सुरू असताना मुरुम शहरातील बालाजी गणेश मंडळाची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत गणेशोत्सव २०२५ साठीची कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली. मागील वर्षी विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून शहरात प्रथम आलेले हे मंडळ सामाजिक, सांस्कृतिक आणि समाजप्रबोधनात्मक उपक्रमांच्या माध्यमातून मानवतावादी संदेश देणारे मंडळ म्हणून विशेष ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाले आहे. सर्व जाती-धर्मातील मंडळी समानतेने कार्यरत असल्याने मंडळाने अल्पावधीतच शहरवासियांचा विश्वास संपादन केला आहे.बैठकीत अध्यक्षपदी सुरज सोबाजी, उपाध्यक्षपदी इमरान जम ादार तर सचिवपदी श्रीकांत शिंदे यांची निवड करण्यात आली. यावेळी मंडळाचे पदाधिकारी गोविंद सोबाजी, तनवीर ढोबळे, अंकुश कौलकर, किरण सोबाजी, संकेत शिंदे, विकास सोबाजी, सम्मेद कौलकर, आकाश सोबाजी, प्रशांत मेगशेट्टी, मेहबूब हराळे, महबूब उडचणे, सुरेश सोबाजी व मारुती बन्ने आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत यंदाच्या गणेशोत्सवात सामाजिक ऐक्य, पर्यावरणपूरक सण व समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# धाराशिव काँग्रेसच्या तालुका सचिवपदी चंद्रकांत माळी यांची निवड




आरंभ मराठी | तेर

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या धाराशिव तालुका सचिवपदी तेर येथील काँग्रेस कार्यकर्ते चंद्रकांत माळी यांची निवड करण्यात आली आहे.प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार व अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष धिरज पाटील यांच्या नेतृत्वाखाली माळी यांची निवड करण्यात आली आहे. तालुकाध्यक्ष विनोद वीर यांनी माळी यांची निवड केली असून निवडीचे पत्र जिल्हा अध्यक्ष धीरज पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.माळी यांच्या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# नाईचाकूर जिल्हा परिषद शाळेतील १०५ मुलींची आरोग्य तपासणी

**उमरगा :**तालुक्यातील नाईचाकूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळेतील किशोरवयीन १०५ मुलींची एचबी तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. याशिबीरात १० ते १९ वर्षे वयोगटातील मुलींची यशस्वी तपासणी करण्यात आली. येथील जिल्हा परिषद प्रशालेतील किशोरवयीन मुलींची व कर्मचाऱ्यांची हिम ोग्लोबिनीची तपासणी करण्यात आली. यावेळी आरोग्य सेविका काजल जाधव यांनी रक्तातील हिमोग्लोबिनची तपासणी करून आवश्यक आहार आरोग्य आणि घ्यावयाची काळजी याबाबत सखोल मार्गदर्शन केले तपासणीसाठी आशा कार्यकर्त्या अश्विनी गडदे, शकीना



आतार, शोभा कांबळे, कोंडाबाई गायकवाड, अंबिका पांढरे, बबीता माने, सत्यभामा गायकवाड यांनी सहकार्य केले.यावेळी शाळेतील मुख्याध्यापक एल.जी. चव्हाण शाळेतील सहशिक्षक जे. डी. आमले पी. डी. भोसले, बाबा गुरूजी, पटेल गुरुजी, पाटील मॅडम यांच्यासह शाळेतील शिक्षक शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बैल पोळा सणात आरक्षणाचा मुद्दा; मराठा समाजाचा सरकारला इशारा

आरंभ मराठी | मुरुड

लातूर ग्रामीण परिसरात पोळा सण पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला.शेतकऱ्यांनी आपल्या जोडीदार बैलांची शृंगार करून मि रवणुका काढल्या.मात्र यंदाच्या पोळ्याला मराठा आरक्षणाच्या चळवळीची जोड मिळाली.शेतकऱ्यांनी बैलांच्या पाठीवर आणि शिंगांवर मराठा समाज हा कुणबी आहे,आम्हाला हक्काचे आरक्षण द्या, मराठा आमदार लाचार आमदार,शेतकऱ्याच्या घामाला न्याय द्या, २९ ऑगस्ट चलो मुंबई अशी घोषवाक्ये लिहून सरकारसमोर ठाम भूमिका म ांडली. शुक्रवारी गावोगाव झालेल्या या उपक्रमामुळे वातावरणात आंदोलनाचा स्वर उमटला. मराठा समाज हा परंपरेने शेतीशी निगडित असून कुणबी म्हणून ओळखला जातो, हे पटवून देत पोळ्यासारख्या शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या सणातून आरक्षणाची मागणी जोमाने व्यक्त करण्यात आली.




यावेळी पशू पालक आप्पासाहेब काळे यांनी सांगितले की,मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आंदोलनामुळे मराठा समाजाच्या हक्काचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर पोहोचला आहे.आम्ही त्यांच्यासोबत आहोत. मराठा समाजाला आरक्षण मिळाल्या शिवाय मागे हटणार नाही .या पोळा




सणाच्या मंगलमय वातावरणात आरक्षणाच्या घोषणा घुमल्याने गावागावात नवा उत्साह पाहायला मिळाला.बैल पोळा हा शेतकऱ्यांचा सण असला तरी, तोच आता मराठा समाजाच्या हक्काच्या लढ्याचा प्रतीक बनला आहे असा सूर दिसून आला.

# 'व्होट चोरी':भारतीयांच्या अर्धवट स्वातंत्र्याची व कमकुवत लोकशाहीची कहाणी

'व्होट चोरी' च्या पापात सर्वच प्रस्थापित राजकीय पक्ष सहभागी. काँग्रेसने 'बूथ' बळकावले होते; आता भाजपने कळस गाठत आख्खी मतदान प्रक्रियाच बळकावली आहे.राहुल गांधींनी काही दिवसांपूर्वी घेतलेली पत्रकार परिषद ही ''व्होट चोरी''च्या मुद्द्याची ठळक उकल करणारी होती. हा मुद्दा केवळ आजच्या काळापुरता मर्यादित नाही; भारतीय लोकशाहीच्या इतिहासात मतांचा गैरवापर, मतदान प्रक्रियेतील फेरफार आणि मतदारांची दिशाभूल हे प्रकार कायमचे जणू घट्ट रोवले गेले आहे.

**'बूथ कॅप्चर'चे दिवस:**

सत्तर-ऐंशीच्या दशकात ''बूथ कॅप्चर'' हा शब्द भारतीय निवडणूक प्रक्रियेतील वास्तव होता. विशेषतः उत्तर भारतात तर निवडणुकीच्या दिवशी संपूर्ण गावच ठरावीक पक्षाचा ठरायचा. सरंजामदारी वृत्तीची राजकारणी मंडळी गुंडगिरी, दमदाटी आणि प्रशासनावर प्रभाव टाकून म तपेट्यांवर कब्जा करीत. अनेकदा सकाळी मतदान सुरू होण्यापूर्वीच पेट्या भरून ठेवण्याचे प्रकार घडत. १९७७ च्या निवडणुकीत इंदिरा गांधींच्या पराभवामागे केवळ आणीबाणीविरोधी जनक्षोभच नव्हता, तर या प्रकारांबद्दल उघड झालेला संतापही होता.

**प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ''व्होट चोरी''**:

''व्होट चोरी'' ही फक्त मतपेट्या पळवून किंवा हॅक करूनच होत नाही. ती अनेक रूपांनी जनतेसम ोर येते :

**(अ) धर्म-जातीचे राजकारण –**

बहुसंख्यांकांच्या अस्मिता भडकवून किंवा अल्पसंख्यांकांच्या भीतीवर खेळून मत चोरणे. १९८० च्या दशकात पंजाबमध्ये धम ार्धारित राजकारणाने मतदानाची दिशा बदलली. बाबरी मशिदीच्या प्रकरणानंतर १९९१-९२ मध्ये संपूर्ण उत्तर भारतात धर्माधारित मतांचे ध्रुवीकरण झाले.

**(ब) दारू-मटणाच्या मेजवान्या**

ग्रामीण भागात अजूनही निवडणुकीपूर्वी 'दारू-मटणाचा दिवस' हा सणासारखा साजरा होतो. पैशाच्या, वस्तूंच्या, भेटवस्तूंच्या स्वरूपात मतांची खरेदी आजही खुलेआम चालते.

**(क) खोटी आश्वासने व ''फ्रीबी कल्चर''** –

मोफत वीज, मोबाईल, गॅस, लॅपटॉप, लाडकी बहीण योजना अशा घोषणा करून मतदारांना आकर्षित केले जाते. याला राजकारणात ''लोकानुनय किंवा लोक लाड'' असे नाव दिले जाते.

**(ड) प्रशासन व मशीनरीचा गैरवापर –**

सत्ताधारी पक्ष स्वतःच्या हितासाठी पोलिस, महसूल, शिक्षण, अगदी निवडणूक आयोगालाही दबावाखाली ठेवतो.

**लोकशाहीचे मूलभूत संकट :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानसभेत स्पष्ट चेतावणी दिली होती की ''राजकीय लोकशाही ही सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीशिवाय टिकणार नाही.''

म्हणजेच, समाजातील विषमता संपवली नाही, तर लोकशाही केवळ नावापुरती उरेल. आजही भारतातील बहुतांश मतदार आर्थिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या अशक्त आहेत. हीच त्यांची कमकुवत बाजू 'व्होट चोरी'स कारणीभूत ठरते. गरीब मतदाराला ५०० रुपये मिळणे म्हणजे दोन दिवसांचा संसार चालवण्याची संधी असते; आणि त्याला मतदान ही फक्त ''विक्रीयोग्य वस्तू'' वाटू लागते. जातीपातीच्या साखळदंडातून अजूनही समाज पूर्णपणे बाहेर आलेला नाही. त्यामुळे 'जात' म्हणजे मतदानाचा सर्वात सोपा 'फॉर्म्युला' झाला आहे.

**पूर्वी 'बूथ कॅप्चर' होत असे; आज ''संपूर्ण प्रक्रिया कॅप्चर'' केली जाते.**

बाबतच्या शंका, मतदार यादीतील गडबडी, मतदार ओळखपत्रात झालेल्या छेडछाड, तांत्रिक प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव

हे सारे ''मतदान प्रक्रियेवरच ताबा मिळवण्याचे'' आधुनिक मार्ग आहेत.

यातच सोशल मीडियाचा गैरवापर, अफवा पसरवणारा ''सेल'' आणि 'फेक न्यूज'चा प्रचंड मारा झाला आहे. २०१९ च्या निवडणुकीत 'राष्ट्रवाद' या भावनिक लाटेने मतदारांना प्रभावित केले, तर २०२४ मध्येही विरोधकांच्या आवाजाला ''देशद्रोह'' म्हणून गप्प करण्याचे तंत्र वापरले गेले.

**अर्धवट स्वातंत्र्य :**

१९४७ मध्ये भारत इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला, पण ती केवळ परकीय राजकीय गुलामी होती.

आज भारतीय मतदार स्वतःच्या धर्म, जात, गरिबी, लोभ आणि भीतीचा कैदी आहे.

म्हणूनच डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेले खरे स्वातंत्र्य व खरी लोकशाही अजून दूर आहे.

भारतीय लोकशाहीची खरी लढाई ही तदान प्रक्रिया पारदर्शक करण्याची, मतदार जागृतीची, सामाजिक-आर्थिक विषमता संपवण्याची, मतदारांना भीती, लोभ आणि धर्माधारित राजकारणाच्या कैदेतून मुक्त करण्याची आहे.राहुल गांधींसारख्या नेत्यांनी ''व्होट चोरी''बाबत आवाज उठवणे हे निश्चितच कौतुकास्पद आहे. पण केवळ एका पक्षाच्या हाती हा दोष टाकून भागणार नाही. 'व्होट चोरी' ही भारतीय लोकशाहीत सर्वच प्रस्थापित पक्षांनी केलेली, अजूनही सुरू असलेली एका सामूहिक पापाची कहाणी आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात लोकांनी जीव धोक्यात घालून स्वातंत्र्य मिळवले. त्यानंतर ''एक व्यक्ती, एक मत'' हा अधिकार मिळवला गेला. पण आज तो अधिकार भीती, लोभ, सत्तेतल्या लोकांची एकाधिकारशाही आणि खोट्या स्वप्नांच्या बाजारात विकला जातोय. हा बाजार उठवायचा असेल तर इंग्रजांच्या विरोधातील लढ्यापेक्षाही तीव्र लढा लढण्याची आवश्यकता आहे.

खरे स्वातंत्र्य हे मतदान प्रक्रियेच्या प्रामाणिकतेत, सामाजिक-आर्थिक विषमता प्रस्थापित करण्यात आहे, आणि तो लढा अजून बाकी आहे.



ॲड. शीतल शामराव चव्हाण
(मो.९९२१६५७३४६)


## आरंभ मराठी ज्येष्ठ नागरिक अशोक चव्हाण यांची अद्भुत कर्तबगारी

# हिमालयाच्या शिखरावर फडकला धाराशिवचा झेंडा

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिवच्या तुळजाभवानी ज्येष्ठ नागरिक ग्रुप व धाराशिव पर्यटन समितीच्या सहकार्याने शहरातील ज्येष्ठ नागरिक अशोक चव्हाण यांनी हिमालय पर्वतरांगांवर चढाई करून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. सेवानिवृत्तीनंतरही साहस आणि तंदुरुस्तीचा अद्वितीय आदर्श घालून देत त्यांनी धाराशिवचे नाव हिमालयाच्या उंच शिखरावर पोहोचवले आहे.

युथ होस्टल असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली. उत्तराखंडातील कठीण ट्रेकिंग मार्गावर त्यांनी आपल्या मित्रासह यशस्वी पाऊल टाकले. ६,००० फूट उंचीवरील गोविंद घाट येथून ट्रेकची सुरुवात झाली. तेथून १५ किमी पायी प्रवास करून त्यांनी १०,००० फूट उंचीवरील घांगरिया गाठले. त्यानंतर १२ किमीचा थरारक प्रवास करत १२,४०० फूट उंचीवरील 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स' या निसर्गरम्य प्रदेशाचा आनंद लुटला. अखेरीस पावसाळ्यातील कठीण हवामान, उणे ३ अंश तापमान आणि धोकादायक वाटा पार करत त्यांनी १४,६०० फूट उंचीवरील हेमकुंड साहेब हे पवित्र स्थळ गाठले.या अद्भुत प्रवासानंतर त्यांनी बद्रीनाथ, भारताचे पहिले गाव मानागाव, प्रसिद्ध वसुंधरा धबधबा तसेच अनेक आध्यात्मिक आणि पौराणिक स्थळांची पायी भटकंती केली. उत्तराखंड दर्शनाच्या



निमित्ताने त्यांनी नैनितालजवळील सात तलावांचा समूह 'सातताल'ही पाहिला. पौराणिक कथांनी नटलेले भीमताल, गरुडताल, कमळताल, नवकुचियाताल आणि इतर सरोवरांच्या कथा ऐकून त्यांनी त्या प्रदेशाचा इतिहासही आत्मसात केला.१५ दिवसांच्या या अविस्म रणीय मोहिमेत त्यांनी व्हॅली ऑफ फ्लॉवर्स, हेमकुंड साहेब, बद्रीनाथ, स्वर्गारोहिणी, गोलू देवता मंदिर, कैंची धाम (नीम करोली बाबा), हनुमान गडी, गरुडगंगा अशा विविध स्थळांना भेट देत अध्यात्म आणि निसर्ग यांचा अनोखा संगम अनुभवला. ज्येष्ठ नागरिक असूनही अशोक चव्हाण यांनी दाखवलेली जिद्द, शारीरिक क्षमता आणि निसर्गप्रेम हे खरंच प्रेरणादायी आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे धाराशिवचे नाव हिमालयाच्या शिखरावर झळकले असून, जिल्ह्यातील पर्यटक व साहसप्रेमींना नवी दिशा मिळाली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०,विभागीय कार्यालयः सेक्टर नंबर ३२४, ई वॉर्ड, रिवोल्युशन, ऑफिस नंबर युजी ०७,स्टेशन रोड, करवीर, कोल्हापूर RNI NO.- 2023/90078,

# गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद शांततेत साजरे करण्याचे आवाहन

आरंभ मराठी | नळदुर्ग

आगामी गणेशोत्सव व ईद–ए–मिलाद हे दोन्ही उत्सव शांततेत साजरे करून नळदुर्गकरांनी हिंदू–मुस्लिम एकतेची परंपरा कायम ठेवावी, असे आवाहन उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. निलेश देशमुख यांनी केले. नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत ते बोलत होते.

ही बैठक २३ ऑगस्ट रोजी पोलिस निरीक्षक सचिन यादव यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी डॉ. निलेश देशमुख तर पोलिस निरीक्षक सचिन यादव व सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीला माजी नगराध्यक्ष मुस्ताक कुरेशी, शहेबाज काजी, दत्तात्रय दासकर, शफीभाई शेख, इमाम शेख, कमलाकर चव्हाण, ईद–ए–मिलाद कमिटीचे अध्यक्ष हाफेज सय्यद नियामतुला इनामदार, माजी नगरसेवक बसवराज धरणे, विनायक अहंकारी, सामाजिक कार्यकर्ते अजहर जहागीरदार, संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकुर, संतोष डुकरे, एमएसईबीचे अभियंता दाऊद तगारे, नगरपालिकेचे अधीक्षक खलील शेख, व्यापारी गणेश मंडळाचे अध्यक्ष सुभाष कोरे, विलास येडगे, सय्यद शहा हुसेन इनामदार, गौस कुरेशी, कयूम सुंबेकर, गौस रजवी आदी मान्यवर उपस्थित होते.बैठकीत उपस्थित सदस्यांनी गणेशोत्सव व ईद–ए–मिलाद हे दोन्ही उत्सव शांततेत व सामंजस्याने साजरे करण्याचे आश्वासन दिले. यावेळी शहेबाज काजी, शफीभाई शेख, कमलाकर चव्हाण, संतोष पुदाले, विनायक अहंकारी, अजहर जहागीरदार, अयुब शेख व शोएब काजी यांनी आपले विचार मांडले.यावेळी बोलताना डॉ. निलेश देशमुख यांनी सांगितले की, कायदा मोडणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल.



किल्ला, बसस्थानक व महाविद्यालय परिसरात पोलिसांची विशेष नजर राहणार आहे. तसेच मिरवणुकीत डॉल्बीचा वापर पूर्णतः बंदीस्त असून, कर्णकर्कश आवाजावर नियंत्रण ठेवले जाईल. बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन भैरवनाथ कानडे यांनी केले.

# ब्राह्मण महासंघाचा जिल्हा पदाधिकारी मेळावा उत्साहात

आरंभ मराठी | धाराशिव

ब्राह्मण महासंघाचा धाराशिव जिल्हा पदाधिकारी मेळावा अनंतदास महाराज मंदिर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याला संस्थापक अध्यक्ष आनंद दवे अध्यक्षस्थानावर होते, तर धाराशिवचे आमदार कैलास पाटील आणि तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मेळाव्यात आनंद दवे यांनी सावरकर आजच्या काळाची गरज, या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी तुळजापूर, धाराशिव, परांडा, वाशी, भूम व लोहारा येथील ब्रम्हवृंद तसेच धार्मिक, पत्रकारिता, वकिली, सामाजिक व साहित्य क्षेत्रातील मान्यवरांचा आमदार कैलास पाटील व आनंद दवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या मेळाव्यात ब्राह्मण महासंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. विलास शाळु यांची मराठवाडा प्रदेश अध्यक्ष,




विकास कुलकर्णी यांची मराठवाडा प्रदेश मार्गदर्शक, हेमंत इंदापुरकर यांची मराठवाडा प्रदेश उपाध्यक्ष, धनंजय पाटील यांची मराठवाडा प्रदेश संघटक, शिवराज आचार्य यांची धाराशिव जिल्हाध्यक्ष तसेच अनिल कुलकर्णी यांची सोलापूर जिल्हाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. मेळाव्यास विश्वस्त मनोज तारे, प्रदेश अध्यक्ष सचिन बोहनी, प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण शिरसीकर, संपर्क प्रमुख उमेश कुलकर्णी, पुणे जिल्हा अध्यक्ष नितीन शुक्ल, जिल्हा उपाध्यक्ष शैलेश देव, ॲड. जगदीश कुलकर्णी, मार्गदर्शिका सगुणाताई आचार्य, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा स्वाती कुलकर्णी, महिला संघटिका मनिषा गोवर्धन, जिल्हा संघटक महेश नाना कुलकर्णी, परांडा तालुका अध्यक्ष समीर कुलकर्णी, वाशी तालुका अध्यक्ष मनोजकुमार जोशी, वाशी शहराध्यक्ष बाळासाहेब पोरे, धाराशिव युवा शहराध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, विंध्य कुलकर्णी, ऋतुराज कुलकर्णी आणि जय कुलकर्णी यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष व शहर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या सोहळ्यास जिल्हाभरातून आलेल्या ब्राह्मण बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मेळाव्याला उत्साहवर्धक प्रतिसाद दिला.

# शिराढोण झेडपी शाळेचे किक बॉक्सिंगमध्ये यश विद्यार्थी व शिक्षकांचा सन्मान

आरंभ मराठी | शिराढोण

कळंब तालुक्यातील पीएमश्री आदर्श जिल्हा परिषद प्रशाला, शिराढोण येथील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी करत शाळेचे नाव जिल्ह्यात गाजवले आहे. या स्पर्धेत ३७ किलो खालील वजनी गटामध्ये अथर्व बाळासाहेब जाधवर याने प्रथम क्रमांक पटकावत विभागीय स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. त्याचबरोबर ५० किलो खालील वजनी गटात प्रतीक्षा पंढरी जाधवर हिने उत्कृष्ट खेळी करून द्वितीय क्रमांक मिळवला.या यशात ३७ किलो खालील गटातील ज्ञानेश्वरी शिवाजी जाधवर व वैष्णवी लखन सहाने यांनी तृतीय क्रमांक मिळवत आपली छाप उमटवली, तर ६० किलोवरील गटामध्ये अक्षरा सतीश गंगणे हिने द्वितीय क्रमांक पटकावत शिराढोणच्या



यशात भर घातली.विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये शिक्षक दत्तात्रय राठोड, संघशील रोडे, पंढरी जाधवर व शिंदे यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.या विजेत्या खेळाडूंसह मार्गदर्शक शिक्षकांचा दि. २१ ऑगस्ट रोजी शाळेत मुख्याध्यापक सुनील अहिरे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवून पुढील स्पर्धांमध्ये आणखी मोठे यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त अनाथ विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य

आरंभ मराठी | धाराशिव

तालुक्यातील वडगाव (सि) येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त वडगाव(सि) ग्राम पंचायत व आद्य क्रांतीपिता लहुजी साळवे प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने अनोखा उपक्रम राबवण्यात आला. जयंती मिरवणुकीतील वायफळ खर्च टाळून गरजू व अनाथ विद्यार्थ्यांना आर्थिक मदत आणि शालेय साहित्य वाटप करण्यात आले.शनिवारी सकाळी १० वाजता जिल्हा परिषद प्रशालेत या कार्यक्रमाचे आयोजन झाले. सरपंच बळीराम कांबळे व प्रतिष्ठानचे अध्यक्ष काकासाहेब कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.गावातील १० अनाथ विद्यार्थ्यांच्या नावाने प्रत्येकी ५ हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट करण्यात आले. त्याशिवाय ९ वी व १० वीतील ६ विद्यार्थ्यांना क्रमिक




पुस्तकांचे संपूर्ण सेट वाटप करण्यात आले.या उपक्रमासाठी आमदार कैलास पाटील, फकिरा दलाचे राज्य प्रमुख सतीश कसबे, युवा नेते अंकुश मोरे, पंचायत समिती सदस्य उत्तम कांबळे, खेडचे सरपंच सुनील गरड, जहागीरदारवाडीचे उपसरपंच अविनाश चव्हाण, आबासाहेब मोरे, सोमनाथ कांबळे, बालाजी पवार तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद,ग्राम पंचायत सदस्य, प्रतिष्ठानचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# गणेशोत्सवात सांजा रोडवरील वाहतुकीत बदल करा

## रणधीर देशमुख यांची मागणी

आरंभ मराठी | धाराशिव

गणपती एकादशीच्या पार्श्वभूमीवर सांजा रोड परिसरात वाहतुकीची मोठी कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन अवजड तसेच एसटीच्या वाहतुकीत तात्पुरते बदल करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीचे शहर उपाध्यक्ष मनोज रघधीर देशमुख यांनी केली आहे. धाराशिव शहरातील गणेश मूर्तींची मिरवणूक सांजा रोड मार्गाने शहरात येत असल्याने या ठिकाणी दरवर्षी प्रचंड वाहतूक कोंडी व अपघाताचा धोका निर्माण होतो. नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर २७ ऑगस्ट रोजी सांजा रोडवरील वाहतूक नियोजन वेगळे ठेवावे, अशी मागणी त्यांनी वाहतूक शाखा पोलिस निरीक्षकांकडे केली आहे. त्यांच्या निवेदनानुसार, एस.टी. बसेस, अवजड वाहने व इतर वाहतूक एस.बी. आय. बँकेपासून वरुडा ब्रिजमार्गे भवानी चौकाकडे वळवावी. तसेच भवानी चौक ते वरुडा ब्रिजकडे जाणारी वाहतूक एस.बी. आय. बँकेच्या मागील रस्त्याने वळवावी. या मागणीची प्रत पोलिस अधीक्षक कार्यालयालाही पाठविण्यात आली आहे.

# जवळा फाटा ते साखर कारखान्याकडे जाणाऱ्या रोडच्या साईट पट्ट्या भरून घेण्याची मागणी

आरंभ मराठी | जवळा नि

परंडा तालुक्यातील जवळा गावांमधून बाणगंगा साखर कारखान्याकडे जाणाऱ्या रोडच्या साईट पट्ट्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होऊ लागले आहेत. सध्या परिस्थितीत रोडच्या साईट पट्ट्यामध्ये पावसाच्या पाणी साचल्यामुळे काही खडडे दिसत नाहीत. खोलग्यात पाणी साचल्याने मोटर सायकलस्वराचा अपघात होऊ लागला आहे.जवळा फाटा ते जवळा गावापर्यंत कोणत्याही प्रकारे साईट पट्ट्याचे काम पावसाळ्याच्या आधी झालेले नाही. यामुळे





वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे.जवळा गावापासून साडेतीन चार किलोमीटर अंतरावर साखर कारखाना असून या रोडवर वाहनांची रहदारी मोठ्या प्रमाणात असल्यामुळे रस्त्याच्या कडेला साईट पट्ट्या हे निकृष्ट दर्जाच्या असून व त्या पावसाळ्याच्या आधी दुरुस्त केले नसल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढू लागले आहे.यामुळे वाहनधारकातून साईट पट्ट्या भरण्याची मागणी मोठ्या प्रमाणात जोर धरू लागली आहे. संबंधित बांधकाम विभागाने या कडील लक्ष देऊन दोन्ही बाजूच्या साईट पट्ट्या भरून देण्याची मागणी ग्रामस्थासह वाहनधारक करत आहेत.

# ज्ञानज्योती अभ्यासिकेत घडलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते सत्कार समारंभ

आरंभ मराठी | उमरगा

सध्याचे युग हे स्पर्धेचे असून, सातत्याने जिद्द आणि चिकाटीने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना यश नक्की मिळते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची वाट सुलभ करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आत्मविश्वास आणि एकाग्रता आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिजाऊ ब्रिगेडच्या प्रवक्त्या रेखाताई सुर्यवंशी यांनी केले. ज्ञानज्योती सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सहकार्याने मागील पाच वर्षांपासून ज्ञानज्योती मोफत अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा वाचनालय केंद्र सुरू आहे. आरोग्य नगरी येथील शिक्षक पतसंस्था कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या या केंद्रात विद्यार्थ्यांना इंटरनेट, संगणक, वाय–फाय यांसारख्या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



या अभ्यासिकेतून अभ्यास करून शासकीय सेवेत रुजू झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ शनिवारी (ता. २३) रोजी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षा चौगुले होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून रेखाताई सुर्यवंशी व वैष्णवी सुरवसे उपस्थित होत्या. कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये कु. सुषमा देसाई (महसुल सहाय्यक), सुप्रिया गायकवाड (कर सहाय्यक), तनुजा राजपूत (विद्युत सहाय्यक), राजनंदिनी घोडके (विद्युत सहाय्यक) आणि अजित बाभळसुरे (विद्युत सहाय्यक) या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अखिलेश बिराजदार यांनी केले, सूत्रसंचालन स्नेहा पवार यांनी केले तर आभारप्रदर्शन शिल्पा जाधव यांनी मानले.

## आरंभ मराठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा विश्वास

# धाराशिव शहराचा कायापालट भाजपाच्या हाती

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव शहराचा चेहरा मोहरा बदलून संपूर्ण कायापालट करण्याची ताकद केवळ भारतीय जनता पक्षात असून, नगरपालिकेचा कारभार भाजपाच्या हाती दिल्यास निधीच्या अडचणीशिवाय विकासकामे मार्गी लागतील, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला. समता कॉलनी येथील छत्रपती संभाजी महाराज उद्यानात नगरविकास विभागाच्या विशेष योजनेतून महिलांसाठी कोटी रुपयांची अद्ययावत जिम आणि मुलांसाठी पन्नास लाखांचे विरंगुळा केंद्र उभारण्यात येणार असून, त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, शहराध्यक्ष अमित शिंदे, माजी नगरसेवक युवराज नळे, सौ. सुनिता साळुंके यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पूर्वीच्या कारभारामुळे शहराची दुर्दशा झाली असली तरी आमदार पाटील यांच्या नेतृत्वाखाली सक्षम नियोजन होऊन धाराशिव शहर आदर्श शहर म्हणून नावारूपास येईल, असे मत युवराज नळे यांनी मांडले. यावेळी प्रभागातील नागरिकांच्या वतीने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा नागरी सत्कार करून आभार मानण्यात आले. यावेळी युवराज नळे, संदीप साळुंके, सुजित साळुंके, राजाभाऊ कारंडे, समर्थ हाजगुडे, निखिल शेरखाने, विनायक लोकरे, विनय माडजे, कैलास पानसे, वैभव मोरे, प्रथमेश दडपे, सुनील अंबेकर, राघव शेरकर, रणजित रणखांब यांच्या हस्ते आमदार पाटील यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला जेष्ठ नागरिक, महिला, युवक व भाजप कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वैशाली महामुनी व सुवर्णा कांबळे यांनी केले.



# श्री सिद्धिविनायक परिवाराकडून शेतकऱ्यांना अंतिम २०० रुपयांचा हप्ता जमा

आरंभ मराठी | धाराशिव



तुळजापूर तालुक्यातील देवकुरुळी येथील श्री सिद्धिविनायक ॲग्रीटेक युनिट क्र. १ व खामसवाडी येथील श्री सिद्धिविनायक ग्रीनटेक युनिट क्र. २ या दोन्ही गुळ कारखान्यांकडून हंगाम २०२४–२५ मधील ऊस बिलाचा २०० रुपयांचा अंतिम हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला आहे. संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली कारखान्याकडून सातत्याने शेतकरीहिताला प्राधान्य देत पारदर्शक कारभार राबविला जातो, असे कारखाना प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.दरम्यान, हंगामातील उर्वरित हप्ता बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर वेळेत देण्याचे आश्वासन यापूर्वी दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी दिले होते. त्यानुसार प्रत्यक्ष अंमलबजावणी करत शेतकऱ्यांच्या खात्यावर अंतिम २०० रुपयांचा हप्ता जमा झाल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी जलद पेमेंट व्यवस्था हीच आमची ताकद आहे.मागील हंगामात सव्वादोन लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप करण्या आले होते. याचा अंतिम हप्ता जमा केला आहे तर पुढील हंगामातही पारदर्शक व विश्वासार्ह कारभार ठेवून आगामी काळात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे हेच उद्दिष्ट असून श्री सिद्धिविनायक परिवाराकडून विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

# शेकडो चिमुकल्या हातांनी साकारले मातीचे गणपती बाप्पा

## रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी आणि कॅनव्हास इंटरनॅशनल स्कुलचा संयुक्त उपक्रम

**आरंभ मराठी | कळंब**

''सर, मला गणपतीचा हात बनवून द्या ना!'माझ्या गणपतीची सोंड बरोबर आहे ना ताई?''अरे देवा, उंदीरमामा राहिलाच की!'' अशा निरागस प्रश्नांनी आणि उत्साहाने शाळेचे पटांगण दुमदुमून गेले होते. निमित्त होते, रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी आणि कॅनव्हास इंटरनॅशनल स्कुलच्या संयुक्त उपक्रमात आयोजित 'आपला गणपती आपण बनवूया' या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेचे. या कार्यशाळेत विविध ३ शाळांवर ९०० हून अधिक विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तीच्या सुबक गणेशमूर्ती साकारल्या. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तीमुळे होणारे जलप्रदूषण आणि मूर्तीची विटंबना रोखण्यासाठी लहान मुलांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कपड्यांवर आणि गालावर माती लागली तरी त्याची पर्वा न करता मुले मूर्ती बनवण्यात तल्लीन झाली होती. यावेळी रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचे अध्यक्ष डॉ. अभिजित जाधवर, सचिव श्याम जाधवर, प्रकल्प संचालक रवि नरहिरे व डॉ. सचिन पवार, रोटेरियन संजय देवडा, धर्मेंद्र शहा, निखिल भडंगे, सचिन डोलारे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षक शरद अडसूळ, भोले सर व कु. विशाखा लिमकर यांनी विद्यार्थ्यांना गणपती बनवण्याचे सोप्या भाषेत प्रशिक्षण दिले. मुलांच्या असंख्य प्रश्नांना उत्तरे देत आणि त्यांच्या चुका दुरुस्त करत त्यांनी अत्यंत संयमाने मार्गदर्शन केले. मुलांचा उत्साह वाढवण्यासाठी शिक्षकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. कार्यशाळेच्या अखेरीस, मुलांनी स्वतः तयार केलेल्या मूर्ती घरी नेताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय होता. हा आनंद पाहून शिक्षक आणि पालकांच्या चेहऱ्यावरही समाधान फुलले होते.



**३ विविध शाळांवर २ दिवस चालला उपक्रम**

दिनांक २४ आणि २५ ऑगस्ट असे २ दिवस हे कला प्रशिक्षण चालले. दिनांक २४ रोजी कॅनव्हास इंटरनॅशनल स्कुल, कळंब येथे तर दिनांक २५ रोजी डिकसळ येथील श्री संत बोधले महाराज प्राथमिक विद्यामंदिर आणि आदर्श इंग्लिश स्कुल, कळंब येथे हा उपक्रम घेण्यात आला.



**बालवयातच पर्यावरण रक्षणाचे संस्कार**

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची सुरुवात बालवयातच होणे आवश्यक आहे. 'आपला बाप्पा आपण बनवूया' यासारख्या कार्यशाळांमधून मुलांना पर्यावरणाचे महत्त्व कळते आणि त्यांच्यात एक चांगली सवय रुजते. हळूहळू या आवडीचे सवयीत रूपांतर होऊन एक पर्यावरणपूरक संस्कृती तयार होईल, याच उद्देशाने आम्ही ही कार्यशाळा आयोजित केली आहे.

– **रवी नरहिरे,** प्रकल्प संचालक, रोटरी क्लब कळंब

# महाद्वारसमोरच पडला खड्डा, प्रशासनाचे दुर्लक्ष



**आरंभ मराठी | तुळजापूर**

श्री तुळजाभवानी मंदिर शहाजीराजे महाद्वार समोर मोठा खड्डा पडला असून तो बुजवण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे भाविक जखमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. महाद्वारसमोर भाविकांची मोठी रेलचेल सुरू असते. मात्र तरी देखील प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. आगामी शारदीय नवरात्र महोत्सव एक महिन्यावर येऊन ठेपला आहे. त्यामुळे तात्काळ हा खड्डा बुजवण्याची मागणी भाविकांतून होत आहे.

# सिनेअभिनेता उमेश जगताप यांची रामकृष्ण परमहंस महाविद्यालयास भेट



**आरंभ मराठी | धाराशिव**

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित , रामकृष्ण परमहंस महाविद्यालयास मराठी चित्रपट सृष्टीतील सुप्रसिद्ध सिनेअभिनेते आणि नाट्यकलाकार श्री उमेश जगताप यांची सदिच्छा भेट दिली.यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संदीप देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले आणि महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाची संपूर्ण माहिती दिली. महाविद्यालयाचा प्रगतीचा आलेख पाहून त्यांनी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांचे अभिनंदन केले. यावेळी प्रा.संभाजी भोसले आणि प्रा.सचिन चव्हाण उपस्थित होते.

# विश्वबंधुत्व दिनानिमित्त ब्रह्माकुमारी येथे भव्य रक्तदान शिबिर


**आरंभ मराठी | धाराशिव**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय सेवा केंद्र, आनंदनगर येथे राजयोगिनी दादी प्रकाशमणीजी यांच्या १८व्या पुण्यतिथीनिमित्त विश्वबंधुत्व दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला साधक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात दादीजींच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यावेळी सिव्हिल सर्जन धनंजय चाकूरकर, सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. दिग्विजय दापके, डॉ. कुलदीप मिटकरी, ब्रह्माकुमारी ज्योती दीदी, प्रियंका दीदी (येडशी सेवा केंद्र प्रभारी), वैजनाथ भाईजी (येरमाळा सेवा केंद्र प्रभारी) आदी मान्यवर उपस्थित होते.या वेळी मार्गदर्शन करताना



ज्योती दीदींनी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे सांगत रक्तदान करा आणि इतरांना नवजीवन द्या, असा संदेश दिला. सिव्हिल सर्जन धनंजय चाकूरकर यांनी ब्रह्माकुमारी संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत भविष्यात असे उपक्रम सिव्हिल हॉस्पिटलमध्येही राबविण्याची सूचना केली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी संस्थेच्या सेवाभावाचा गौरव केला, तर डॉ. दिग्विजय दापके यांनी मानवतेसाठी या सेवा अद्वितीय आहेत; सध्या मन:शांतीची गरज अधिक आहे, असे आवाहन केले.या शिबिरात २०० हून अधिक साधक उपस्थित राहिले. त्यांनी रक्तदात्यांना प्रोत्साहन दिले. अनेकांनी उत्साहाने रक्तदान करून समाजसेवेचा आदर्श घालून दिला. रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आणि शेवटी सर्वांना महाप्रसादाचे वितरण झाले.

# हातलाई शुगरचा रोलर पूजन सोहळा



**आरंभ मराठी | धाराशिव**


जवळा (खुर्द), (ता. कळंब) येथील हातलाई शुगरमध्ये गळीत हंगामाच्या प्रारंभी रोलर पूजनाचा विधिवत कार्यक्रम सहकुटुंबीयांसह पार पडला. वेळेत गळीत हंगाम सुरू होणार असल्यामुळे शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले.यावेळी ऊस उत्पादकांच्या हितासाठी सतत प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमास सरपंच सागर लोमटे, शितल गायकवाड, व्यवस्थापक सादीक मुंढे, लेखाधिकारी श्री. घाडगे, श्री. लोमटे, सुरक्षा अधिकारी श्री. थोडसरे, शेतकी अधिकारी श्री. कदम, श्री. अमोल शेळके यांच्यासह परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणपती उत्सवासाठी पुणे ते कोल्हापूर विशेष रेल्वे सुरू करा

## आमदार सतेज पाटील यांची मागणी

**आरंभ मराठी | कोल्हापूर**

गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाढणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता कोल्हापूरचे आमदार सतेज पाटील यांनी पुणे–कोल्हापूर मार्गावर विशेष रेल्वेगाड्या सुरू करण्याची मागणी रेल्वे मंत्रालयाकडे केली आहे.दरवर्षी गणपती सणात मुंबई, पुणे आणि इतर शहरांमधून हजारो भाविक कोल्हापूर व परिसरात आगमन करतात. नियमित रेल्वेगाड्यांमध्ये प्रचंड गर्दी होऊन प्रवाशांना जागेअभावी त्रास सहन करावा लागतो. वेळापत्रक



अनियमित होत असल्याने भाविकांचा प्रवास अधिकच कठीण होतो.या पार्श्वभूमीवर आमदार पाटील यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र पाठवून पुणे–कोल्हापूर–पुणे मार्गावर तात्पुरती विशेष गाडी चालवावी, अशी मागणी केली आहे. भाविकांचा प्रवास सुरक्षित, सुकर आणि वेळेत व्हावा यासाठी विशेष गाडी सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि नोकरदार प्रवाशांनी या मागणीचे स्वागत केले असून, रेल्वे प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन उत्साहात

**आरंभ मराठी | धाराशिव**

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित, रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा वर्धापन दिन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख,यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. संदीप देशमुख यांच्या हस्ते विद्यापीठाचा ध्वजफडकावूनध्वजारोहणकरण्यातआले. याप्रसंगी सर्वप्रथम शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशीला देवी साळुंखे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ.संदीप देशमुख यांच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले. यावेळी डॉ.संदीप देशमुख यांनी विद्यापीठ वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देताना विद्यापीठ स्थापनेचा इतिहास यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.आणि उपस्थित सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांना आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य बबन सूर्यवंशी, सांस्कृतिक विभाग प्रमुख, प्राध्यापक विवेकानंद चव्हाण,जिमखाना विभाग प्रमुख प्राध्यापक राजा जगताप, जिमखाना विभाग प्रमुख कनिष्ठ विभाग,प्राध्यापक सचिन चव्हाण,प्रसिद्धीप्रमुख डॉ. मारुती अभिमान लोंढे ,आदीसह सर्व गुरुदेव कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वरिष्ठ विभागाचे स्टाफ सेक्रेटरी , डॉ.बालाजी गुंड,आदीसह सर्व गुरुदेव कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांचे आंदोलन सातव्या दिवशीही कायम

## जिल्ह्यात ग्रामीण आरोग्य सेवा ठप्प

### समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचाही सक्रीय सहभाग

**आरंभ मराठी | धाराशिव**

राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) कर्मचाऱ्यांचे आंदोलन आज सातव्या दिवशीही कायम असून, या आंदोलनामुळे जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य सेवा ठप्प झाली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमधील नियमित कामकाज विस्कळीत झाले असून, सामान्य नागरिक व शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे या आंदोलनात समुदाय आरोग्य अधिकारी (CHO) यांचाही सक्रीय सहभाग असून, आंदोलनाला अधिक बळ मिळाले आहे. कर्मचाऱ्यांनी शासनाकडे दहा वर्षांची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे समावेशन तातडीने करण्यात यावे, दरवर्षी मानधनात वाढ करून २०२४–२५ साठी विशेष दहा टक्के वाढ द्यावी, सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांना लोन व बोनस सुविधा मिळावी, तसेच दहा लाखांचा उपचार विमा, पंचवीस लाखांचा मृत्यू विमा व पाच लाखांचा अपंगत्व विमा लागू करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. शिवाय निवृत्तीनंतरचे लाभ, पगार समायोजन, जुनी पेन्शन योजना लागू करणे, सामुदायिक आरोग्य अधिकाऱ्यांचे नियमितीकरण, Hardship Allowance व Pay Protection लागू करणे आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांचे कायम समायोजन करणे या मागण्यांवरही आंदोलनकर्ते ठाम आहेत.लवकरच तोडगा न काढल्यास हे आंदोलन आणखी तीव्र केले जाईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी शासनावर राहील,असा इशारा देण्यात आला आहे, सात दिवसांपासून सुरु असलेल्या या आंदोलनामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली असून गावोगावी रुग्णसेवेत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

**आरंभ मराठी** उमरगा येथे बँकेची २९ वी सर्वसाधारण सभा उत्साहात

# उमरगा जनता बँकेच्या सभासदांना ७ टक्के लाभांश मिळणार: चेअरमन शरण पाटील

**आरंभ मराठी | उमरगा**

आरबीआयच्या सर्व निकषांचे पालन करून सर्वसामान्यांचा विश्वास संपादन केलेली उमरगा जनता सहकारी बँक शून्य टक्के एनपीए करण्याचे उद्दिष्ट ठेवून वाटचाल करत असून, सभासदांना ७ टक्के लाभांश दिला जाणार आहे,अशी घोषणा बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील यांनी सोमवारी (दि. २५) उमरगा येथे झालेल्या २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केली. सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन शरण बसवराज पाटील होते. व्यासपीठावर जिल्हा बँकेचे चेअरमन बापुराव पाटील, उमरगा जनता बँकेचे व्हा. चेअरमन ॲड. विरसंगप्पा आळंगे, माजी चेअरमन रामकृष्णपंत खरोसेकर, माजी उपाध्यक्ष ॲड. प्रदीप पणुरे, विठ्ठलसाई कारखान्याचे कार्यकारी संचालक सुरेश गवसाने




यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.सोने तारण, सोलार, वाहन, गृह तसेच व्यवसाय कर्जासोबतच मराठा तरुणांना आण्णासाहेब पाटील महामंडळ अंतर्गत व्यवसायासाठी माफक व्याजदराने कर्ज वाटप करण्यात येत असल्याचेही चेअरमन पाटील यांनी स्पष्ट केले. बँकेकडे २२५ कोटींच्या ठेवी असून सभासदांचे भागभांडवल ८ कोटी ३५ लाख, राखीव निधी २२ कोटी २० लाख आहे. सभासदांना ११५ कोटींचे कर्ज वाटप झाले असून ४ कोटी रुपयांचा ढोबळ नफा नोंदविला आहे. खेळते भांडवल २६६ कोटी ६८ लाख, तर गुंतवणूक १३५ कोटी २४ लाख आहे. ठेवींमध्ये सातत्याने वाढ होत असून हे ग्राहकांच्या विश्वासाचे द्योतक असल्याचे पाटील यांनी सांगितले.

# केसरजवळगा येथे तेरणा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत आरोग्य शिबिर

**आरंभ मराठी | मुरुम**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य रुग्णांना योजनांची माहिती नसतेच, त्यात आर्थिक भार पेलणेही शक्य नसते. त्यामुळे तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे आयोजित मोफत आरोग्य शिबिर ही सर्वसामान्यांसाठी नवसंजीवनी ठरत असल्याचे प्रतिपादन भाजप नेते संताजी चालुक्य यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (ता.२३) रोजी केसर जवळगा येथे तेरणा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी, उपचार शिबिर व जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन संताजी चालुक्य यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले, ''तेरणा स्पेशालिस्ट हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, नेरूळ यांच्या माध्यमातून अनेक गावांमध्ये मोफत आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. ग्रामीण रुग्णांना मुंबई येथे मोफत ने–आण, शस्त्रक्रिया आणि



उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यात रुग्णांचा कसलाही खर्च होत नाही. त्यामुळे या शिबिरांचा सर्वसामान्य रुग्णांना मोठा फायदा होतो आहे.''शबिरात अनेक नामवंत डॉक्टरांनी तपासणी केली. ग्रामीण भागातील लोकांना या शिबिरांचा मोठ्या प्रमाणावर लाभ मिळत असून गेल्या अनेक वर्षांपासून या ट्रस्टतर्फे सामाजिक कार्य सातत्याने सुरू आहे. तसेच, जनता दरबाराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांच्या विविध तक्रारी सोडविण्याचाही प्रयत्न करण्यात येत असल्याचे संताजी चालुक्य यांनी सांगितले.या प्रसंगी भाजप तालुका अध्यक्ष सिद्धेश्वर माने, माजी सरपंच बाबासाहेब डांगे, तालुका सरचिटणीस लोकेश बिराजदार, दत्तात्रय घोडके, स्वामीनाथ घोडके, माजी सरपंच अमोल पटवारी, उपसरपंच अझर इनामदार, कल्याणी पाटील, शब्बीर इनामदार, जयपालसिंह राजपूत, कैलास राजपूत, सतीश डांगे, दयानंद कलशेट्टी, निगप्पा कंटेकुरे, ॲड. सुशील शिंदे, माजी सरचिटणीस सागर पाटील, विठ्ठल चिकुंद्रे, सतीश सरवदे यांसह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ट्रस्टचे संयोजक उपस्थित होते.